# क्वचित तोल सुटलेली पण एक इमानदार पायाभरणी

## अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी - आलोचना, संपा. वसंत दावतर, मुंबई, (महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ पुरस्कृत), सप्टेंबर १९७०)
(भास्करबुवा बखले : नी. म. केळकर १९६७, भारत गौरव ग्रंथमाला, कर्नाटक प्रकाशन संस्था, मुंबई दोन, मूल्य पंचवीस रुपये)

श्री. नी. म. केळकरांनी पं. भास्करबुवांचे जे विस्तृत चरित्र लिहिले आहे, त्याचे महत्त्व आहे. ज्यांच्या आयुष्यात वर्णन संपविता येऊ नयेत अशा घटना वारंवार घडतात, अशात गवयांचा समावेश जरूर केला पाहिजे. त्यांनी विद्यार्जनासाठी केलेले कष्ट, मान्यतेसाठी केलेली तपश्चर्या, निरनिराळ्या बैठकात रसिकांवर, टीकाकारांवर मिळवलेले विजय आणि जीवनाच्या विविध क्षेत्रांतून येणाऱ्या व्यक्तींशी जुळणारे त्यांचे भावसंबंध, यापैकी प्रत्येक गोष्ट रोमहर्षक ठरू शकते. त्यात आणि ब्रिटिशपूर्व कलासक्त आणि कदरदान राजेशाही जेव्हा शेवटची तान घेत होती, त्या एकोणिसाव्या-विसाव्या शतकाच्या जुळणीच्या काळखंडाचा महिमा लक्षात घेतला की, या काळातील कलावंतांच्या जीवनासवे गळाच रंग चढतो. शिवाय आणखी पं. भास्करबुवांसारख्या भारतभर गाणे रुजवून आलेल्या, शास्त्री, नट, आणि गायक यासारख्या मूलत: अनेकरंगी व्यवसायात पडलेल्याची कथा असली की विचारावयास नको. संपूर्ण चरित्रासच एक स्वतःचा असा रंग प्राप्त होतो. त्यातल्या वस्तुस्थितीलाच (facts) बोलकेपणा प्राप्त झाल्याचा अनुभव येऊ लागतो. क्षमाग्राही स्वरात सनावळी, वंशावळी आणि त्यासारख्या इतर गोष्टी सांगत बसण्याची आपत्ति चरित्र लेखकावर ओढवत नाही. वृत्तांत रंजक करणे इ. काहीतरी स्वतः मुद्दाम करण्याची जबाबदारी चरित्रलेखकावर न पडता अंगतः रंजक वृत्ताला कंटाळवाणेपणा येऊ न देण्याचे तुलनेने पाहात सोपे असणारे काम त्याच्याकडे राहाते. हे साधण्यासाठी पहिली आवश्यक गोष्ट म्हणजे चरित्रलेखक स्वतः चरित्रनायक व त्याचे जीवन यांच्याशी समरस झालेला पाहिजे. श्री. नी. म केळकर पं. भास्करबुवांशी तादात्म्य पावले आहेत. हे पदोपदी जाणवते. लहानपणासून बुवांच्या गाण्यात डुंबलेले श्री. केळकर त्या गाण्याने अगदी फुलप्रुफ झाले आहेत. इतकेच नव्हे, तर बुवांना व्यक्ती, माणूस म्हणूनही नायक मानण्याकडे ते झुकले आहेत. बुवांच्या अडीअडचणी, त्यांच्या हालअपेष्टा, त्यांचे यशापयश आणि त्यांची सुखदुःख सारीच त्यांच्या दृष्टीने 'विशेष' दर्जाची झाली आहेत. परिणामतः श्री. केळकर बुवांना आपल्या समोर उभे करण्यात यशस्वी होतात. इतकेच नव्हे, तर त्यांचा दर्जाही (stature) नायकाचा होता याचा प्रत्यय आणून देतात.

केवळ या समरसतेमुळे बुवांचे चरित्र केळकर वाचनीय रंजक वा हुरहुर लावणारेही करू शकले असते. पण एवढ्याच भांडवलावर चरित्र महत्वाचे ठरू शकले असते असे नाही. सांगीतिक लिखाणात निव्वळ भावपूर्ण, सरसकट पूजाभावी मजकुराची काही कमतरता नाही. पण बुवांचे गायक म्हणून चरित्र लिहिताना एका सबंध कालखंडाचा सांगीतिक संदर्भ उपलब्ध करून देण्याची कामगिरीही केळकरांनी पार पाडल्याने त्यांनी लिहिलेले चरित्र महत्त्वाचे झाले आहे. सांगीतिक कालखंड उभा केला आहे तोही पुन्हा सामाजिक data देऊन नव्हे, तर चरित्रनायकाच्या आयुष्यातील प्रभावी प्रेरणा (प्रस्तुत प्रसंगी गायनाभ्यास, गायनाविष्कार या त्या प्रेरणा होत.) आणि तत्संबद्ध क्षेत्रांतील तत्कालीन प्रेरणा यांचे नाते एकसारखे दाखवून त्यांच्या परस्परांवरच्या प्रतिक्रिया बारकाईने नोंदवून. यामुळे कालपट आणि कलापट दोन्ही समोर येतात आणि यात एक सारखी वाटचाल करू पाहणारी आकृती म्हणजे भास्करबुवा, अशी प्रतीति येते. कलेचा संदर्भ व्यक्तीला, व्यक्तीचे परिमाण व तिचा दृष्टिकोन कलादर्शनासाठी आणि कालाची गती या दोघांनाही पुढे नेणारी, असे हे जिवंत बहुदिश संबंध प्रस्थापित होतात आणि सर्वच लेखनाला एक प्रकारची घनता, एक वास्तवस्पर्श, 'विशेषणी' लिखाणाच्या पार वर नेऊन ठेवतात.

हे सारे केळकरांना जमले आहे, याचे कारण इतर सांगीतिक चरित्रकारांपेक्षा साहित्यादी कलात त्या मानाने अधिक दृढमूल झालेला इतिहासकाराचा दृष्टीकोन त्यांनी अधिक पूर्णतेने स्वीकारला आहे. माहिती जमा करणे आणि योग्य त्या साधनांनी पारखल्यानंतरच ती उपयोगात आणणे, या पद्धतीचा त्यांनी केलेला वापर पाहण्यासारखा आहे. पत्रव्यवहार, आठवणी, मुलाखती, दप्तरे आणि लिखित साहित्य, साऱ्यांचा उपयोग करताना त्यांनी संशोधकी खाक्या नेकीने अवलंबिला आहे. चरित्रनायक हा केळकरांचाही नायक आहे, हे खरे. पण तरीही त्या नायकाचे दर्शन घडवितांना केळकर सत्यकथनाचे वाण पत्करल्याची जाणीव सतत ठेवत असल्याने अगदी असह्य आणि बटबटीत सत्यप्रलाप वा अतिशयोक्ती लेखनात कुठेही बोचत नाही. या बाबतीतला एरवी लक्षात येणारा संगीत जगतातला सार्वत्रिक ढोबळपणा पाहिला की केळकरांच्या (या काहीशा केतकरी) संशोधकी बाण्याचे महत्त्व सहज कळू लागते. एखाद्या संगीतकाराने वा वाङ्मयादि कलात केळकरांइतके न मुरलेल्या व्यक्तीने जर हे काम हाती घेतले असते, तर काय झाले असते, याची कल्पना केल्यास केळकरांच्या या पायाभरणीचे वेगळेपण ध्यानात येण्यास हरकत नाही. केळकरांनी लिहिलेल्या या चरित्रावरून पं. भास्करबुवांचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान सहज लक्षात येते. महाराष्ट्रात विसाव्या शतकाच्या आरंभी पाय रोवून असलेल्या गायकीचा हेतुपुरःसर समन्वय घालण्याचा प्रयत्न करणारे भास्करबुवा आद्य समावेशक कलावंत म्हणून नजरेसमोर येतात. गायनाची अनेक अंगे, गायनाचे बहुविध प्रकार, या प्रकारांचे वेगवेगळया आकर्षकपणाने नटलेले आविष्कार, या साऱ्यांनी आपला कलाविष्कार सिद्ध व्हावा, याची भास्करबुवांनी खबरदारी घेतली होती. हे लक्षात येताच त्यांच्या कलाजाणिवेचा आवाका व त्यांच्या प्रयत्नांचे सर्वस्पर्शित्व यांची खात्री पटू लागते. आपले असे कलावंताला खास इमान असते. पण याला सामोरे जातांना कर्मकांडी कडवेपणा न करता श्रोत्यांच्या मगदूराची, त्यांच्या कलेची जाण ठेवून बुवा लावणीपासून ध्रुपदापर्यंत सर्व काही निःसंकोचपणे गात, हे निश्चितच लक्षणीय होय. महाराष्ट्राच्या नाट्यसंगीतात भर टाकणारे भास्करबुवा, महाराष्ट्राबाहेर 'बम्मन गवयाला' प्रतिष्ठा प्राप्त करून देणारे भास्करबुवा आणि गाणे कधी न पडल्याचे आश्चर्य शक्य करणारे भास्करबुवा, इ. साऱ्या विशेषांमुळे चरित्रनायक (चरित्रापेक्षाही मोठा), असेही म्हणण्याचा मोह होऊ शकेल इतके प्रभावी चरित्र केळकरांनी लिहिले आहे, यांत शंका नाही.

खुद्द बुवांच्या मोठेपणाची खुण जशी त्यांच्या स्वतःच्या गाण्यात मिळते, तशीच गाण्याविषयी ते जे बोलत वा लिहीत त्यातूनही मिळते. अर्थात् याचा फारसा पुरावा उपलब्ध नाही. समाजाच्या पत्रिकेसाठी म्हणून लिहावयास घेतलेल्या मालेतील एक लेख परिशिष्टात छापला आहे. या लेखात पं. भातखंड्यांच्या पद्धतीनेच गायनाचा विचार केलेला व मांडलेला आढळतो. बुवांचा गायनविचार इतर अनेक तत्कालीन गायकांप्रमाणे पं. भातखंड्यांना अकारण विरोधी नव्हता, इतके अनुमान काढण्यास हरकत नाही. पण याहीपेक्षा खर्ज साधना करणे आवश्यक नाही, यासारखी त्यांची मते अधिक लक्षणीय वाटतात. बुवांनी आवाज तयार केला, अशी नोंद आहे. त्याचप्रमाणे त्याच्या प्रभावाचेही वर्णन आहे. तेव्हा गवयांना जिव्हाळयाच्या वाटणाऱ्या 'आवाज' या विषयावरचे त्यांचे हे मत विचार करण्यासारखे वाटते. बालगंधर्व आणि मास्तर कृष्णराव यांचे आवाज तालमीने बिघडले नाहीत. यावरूनही त्यांच्या गायनशिक्षणाचा आणखी एक संबंधित विशेष ध्यानात येण्यास हरकत नाही.

शिष्याचे स्वत्व व व्यक्तिगत वैशिष्ट्य, याविषयी बुवांना गुरु या भूमिकेवरूनही जो आदर वाटत होता, त्यामुळे बुवांना निरनिराळया वळणाचे शिष्य तयार करता आले. खुद्द केळकर मात्र हे मानताना दिसत नाहीत. बालगंधर्व आणि मास्तर यांचा उल्लेख ते ज्या तऱ्हेने करतात, त्यांत हे दिसून येते. उदाहरणार्थ :

'बुवांच्या स्वरसाधनेचे स्थूल स्वरूप गंधर्वांच्या गळयात उमटले. त्यांच्या लयकारीचा किंचितसा भाग मास्तर कृष्णरावांच्या गाण्यात दिसे' (पा.२०५.) तसेच, 'बुवांच्या अंगी मैफलीला डोलत ठेवायचे जे कौशल्य होते, त्याचे अनुकरण करण्याचाही मास्तरांचा प्रयत्न असे' (पा.१८९.)

'गंधर्वांच्या गाण्यात सुरेलपणा व लयकारीचा एक नवा आदर्श बुवांनी प्रस्थापित केला आणि तोही एका अशिक्षित गायकाचा दर्जा संभाळून.' (पा.२००.)

या दोन्ही गायकांना स्वतंत्र प्रज्ञा नव्हती, ते गायले ते बुवांनी जेवढे व जसे शिकविले तेवढे व तसेच. असा केळकरांच्या लिखाणाचा जो रोख आहे, तो निश्चितपणे अन्यायकारक आहे. विलायतहुसेन खांसाहेबांबद्दलही केळकरांचा उल्लेख असाच जरा तोल सुटलेला आहे. आपण भास्करबुवांकडूनही दहा पंधरा चीजा घेतल्याचा खांसाहेबांनी उल्लेख केला आहे. त्याचा निर्देश करून केळकर म्हणतात, 'खुद्द विलायत हुसेन खाँसाहेबांनीच लिहून ठेवले म्हणूनच भास्करबुवांकडे त्यांना शिक्षण मिळाले असे मानावे लागते... खांसाहेबांचे गाणे इतक्या भिन्न शैलीचे की, त्यांनी बुबांचे गाणे नुसते ऐकले तरी असेल की नाही, अशी दाट शंका येई. मग प्रत्यक्ष शिक्षण तर दूरच. त्यांच्या स्वर लावणे, राग विस्तार, वगैरे कोठल्याच अंगावर भास्करबुवांच्या गायकीचा अस्पष्टही संस्कार दिसत नसे.' (पा.२०१-२०२.)

या व अशा तऱ्हेच्या विधानांमागची विचारसरणी एकांगी आहे. आपल्याहून ज्येष्ठ आणि आपल्यास मान्य असलेल्या कलावंताकडून काही तरी शिकून घेण्याचा गवयांचा प्रघात असतो. यांत त्या गवयाची गायकी घेणे, त्याच्यासारखे गाणे, असे उद्देश असतातच असे नाही. 'उनसे भी दसपंधरा चीजें ली है' असा आदराने उलेख होतो, तेव्हा ध्वनित होणारे शिष्यत्व परमार्थाने घ्यावयाचे नसून काहीसे प्रतीकात्म मानावयाचे असते. केळकरांना बुवांनी इतके भारले आहे की, बुवांकडे शिकूनही लोके वेगळे आणि तरी श्रेष्ठ गाऊ शकतात, हे त्यांना मनोमन पटत नाही. जे बुवांना मनोमन पटले होते ते बुवांच्या या अनन्य भक्तास पटू नये, हा एक चिंत्य विरोधाभास म्हटला पाहिजे.

अर्थात यामुळे केळकरांनी केलेल्या खटाटोपाचे महत्त्व कमी होत नाही. गायकांची चरित्रे संशोधकी बाण्याने गायकीच्या भक्ताने लिहावीत, असे त्यांच्या प्रयत्नामुळे स्थापित झालेल्या सिद्धांताचे वर्णन करता येईल. या तऱ्हेने होणाऱ्या मराठीतल्या चरित्र लेखनाची केळकरांनी पायाभरणी केली आहे.

---